भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/८९**
**आरपीसीडी.एफ.आयडी.बीसी.क्र.१०/१२.०१.०३३/२०१३-१४** जुलै ०१, २०१३

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/
मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका

महोदय,

**<u>एसएचजी - बँक लिंकेज कार्यक्रमावरील महापरिपत्रक</u>**

रिझर्व बँकेने वेळोवेळी एसएचजी-बँक लिंकेज कार्यक्रमावर अनेक मार्गदर्शक तत्वे/सूचना दिल्या आहेत. ह्या विषयावरील सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे एकाच ठिकाणी मिळावीत ह्यासाठी अद्यावत केलेले हे महापरिपत्रक देण्यात येत आहे. ह्या महापरिपत्रकात रिझर्व बँकेने जोडपत्रात दिलेल्या परिपत्रकातील सूचना ३० जून २०१३ पर्यंत अद्यावत करुन एकत्रित करण्यात आल्या आहेत,

आपला विश्वासु

(ए.उद्‌गाता)
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

सोबत वरीलप्रमाणे

ग्रामीण योजना आणि क्रेडिट विभाग, केंद्रीय कार्यालय, १०वा मजला, केंद्रीय कार्यालय बिल्डिंग, शहीद भगत सिंग मार्ग, पोस्ट बॉक्स नं १००१४ मुंबई - ४००००१ टेलि क्रः ९१-२२-२२६६१६०२/ २२६०१०००फॅक्स क्रः ९१-२२-२२६२१०११/२२६१०९४३/२२६१०९४८ ई-मेल आयडी: cgmicrpcd@rbi.org.in

## <u>एसएचजी - बँक लिंकेज कार्यक्रमावरील महापरिपत्रक</u>

(१) देशात कर्ज प्रणालीचा कितीही विस्तार झाला असला तरीही अनेक ग्रामीण क्षेत्रातील गरीब जनता, अजूनही तातडीच्या खर्चासाठी सावकारांवरच अवलंबून आहे. सीमा रेषेवरील शेतकरी, जमीन नसलेले मंजुर, छोटे व्यापारी आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील व जमातीमधील, बचत क्षमता कमी असलेले कारागीर ह्यांची त्यांची बचत करण्याची क्षमता खूप कमी असल्याने बँका तिथवर पोहोचू शकत नाहीत. अनेक कारणांमुळे जनसंख्येच्या ह्या क्षेत्रांना कर्ज पुरवठा करण्याबाबत कार्य झाले नाही. बिनसरकारी संस्थांनी (एनजीओ) प्रायोजित केलेल्या गटांचे, नाबार्ड, एपीआरएसीए आणि आयएलओ ह्यांनी केलेल्या अभ्यासातून दिसून आले की, सेल्फ हेल्प सेव्हिंग्ज आणि कर्ज गटांमध्ये बँकिंगचा साचा व ग्रामीण भागातील गरीब एकत्र आणण्याची क्षमता आहे व त्यांनी केलेले काम प्रोत्साहनार्ह आहे.

२) त्यानुसार, नाबार्डने, असरकारी संस्था तसेच त्या चाचणी प्रकल्पाखाली असलेल्या बँका व इतर एजन्सींनी प्रायोजित केलेल्या स्वयं-सेवा गटांना (एसएचजी) मदत करण्यासाठी एक चाचणी प्रकल्प सुरु केला व त्याला पुनर्वित्तसहाय्य दिले, काही राज्यांमध्ये, ह्या जोड प्रकल्पाच्या परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी नाबार्डने केलेल्या शीघ्र अभ्यासातून, उत्साहवर्धक व सकारात्मक लक्षणे दिसून आली, जसे, एसएचजींच्या कर्जांच्या आकारमानातील वाढ, उत्पन्ननिर्माण न करणाऱ्या कार्यकृतीं ऐवजी उत्पादन करण्याच्या कार्यकृतींसाठी कर्जे घेण्याकडे झालेला कल, जवळ जवळ १००% परतफेड/वसुली, तसेच बँका व कर्जदार ह्यांच्यासाठी व्यवहारांच्या खर्चात लक्षणीय घट इत्यादि. आणि त्याशिवाय एसएचजी सभासदांच्या उत्पन्न स्तरामध्ये हळूहळू वाढही होत असल्याचे दिसून आले. ह्या व जोड प्रकल्पात दिसून आलेली आणखी एक बाब म्हणजे, बँकेशी जोडलेल्या गटांपैकी ८५% गट हे स्त्रियांनी तयार केलेले होते.

३) एसएचजी व एनजीओंच्या कार्यकृतींचा विस्तार करण्यासाठी व ग्रामीण भागात त्यांची भूमिका/कार्य खोलवर जाव्याबाबतच्या कार्याचा अभ्यास करता यावा ह्यासाठी, रिझर्व बँकेने, नोव्हेंबर १९९४ मध्ये एक कार्यगट केला व त्यात महत्वाच्या असलेल्या एनजीओंमधील शिक्षणशास्त्रज्ञ सल्लागार, बँकर्स असलेल्या व्यक्ती होत्या नाबार्डचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री एस. के. कालिया अध्यक्ष होते. ह्या कार्यकारी गटाच्या मते, एसएचजींची बँकेबरोबर अशा प्रकारे जोडले जाणे, ग्रामीण भागातील गरीबांपर्यंत बँक प्रणालीद्वारा कर्ज सुविधा देण्याच्या उद्देशाने वाजवी खर्च असलेला, पारदर्शक व लवचिक असा दृष्टिकोन असून, तो बँकांसमोरील दोन प्रश्नांचे, (म्हणजे ग्रामीण भागात दिलेल्या कर्जांची वसुली व छोट्या कर्जदारांना वारंवार दिल्या जाणाऱ्या कर्जासंबंधीचा मोठा खर्च) उत्तर ह्याद्वारे दिले जाते. ह्यामुळे ह्या गटाच्या मते हे धोरण, असे एसएचजी तयार करुन त्यांची जोडणी बँकांशी केली जावी आणि ह्याबाबत बँकांनीच मुख्य भूमिका स्वीकारावी. ह्या कार्यगटाने शिफारस केली आहे की बँकांनी असा जोडणी कार्यक्रम म्हणजे एक व्यापारी संधी असलेल्याचे समजावी आणि त्यांनी इतर बाबींबरोबर क्षमता, स्थानिक गरजा, उपलब्ध कौशल्ये इत्यादी विचारात घेऊन विशिष्ट क्षेत्रे व विशिष्ट गटांसाठी विशिष्ट अशी कर्जांची पॅकेजेस तयार करावीत

४) मायक्रो-वित देण्याबाबतच्या निरनिराळ्या प्रश्नांची छाननी करण्यासाठी रिझर्व बँकेने ऑक्टोबर २००२ मध्ये चार गट तयार केले. भारतीय रिझर्व बँकेच्या नाणेविषयक धोरणात तसेच केंद्रीय अंदाजपत्रकाच्या वेळोवेळी घोषित केलेल्या धोरणांमध्ये एसएचजींची जोडणी बँकांबरोबर करण्याबाबत जोर दिला गेला आहे. आणि ह्याबाबत निरनिराळी मर्गदर्शक तत्वेही देण्यात आली आहेत. असा एसएचजी-जोडणीचा कार्यकम वाढविण्यासाठी व तो टिकवून ठेवण्यासाठी, बँकांना सांगण्यात आले होते की, धोरण तसेच अंमलबजावणीच्या स्तरावरील कर्ज देण्याबाबतचा एक भाग म्हणून, त्यांनी, एसएचजींना कर्ज देण्याचा विचार करावा. त्यांनी, त्यांच्या कॉर्पोरेट योजना/डावपेच, त्यांच्या अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम ह्यामध्ये एसएचजी जोडणीचाही समावेश करावा आणि नियमित धर्तीवर त्याची अंमलबजावणी करुन त्यावर देखरेख ठेवून नियतकालिक आढावा घ्यावा.

**५) प्राधान्य क्षेत्राखाली वेगळा विभाग :** एसएचजी-कर्जाबाबतची माहिती बँकांना विनात्रास कळविता यावी ह्यासाठी असे ठरविण्यात आले होते की, बँकांनी एसएचजी आणि/किंवा एनजीओंना दिलेली व एसएचजी/एसएचजींचे सभासद ह्यांना द्यावयाच्या कर्जाबाबतचा अहवाल नवीन विभागाखाली (म्हणजे,"एसएचजीना दिलेल्या अग्रिम राशी") पाठवावा-मग एसएचजींच्या सभासदांनी ती कर्जे कोणत्याही कामासाठी दिली गेली असोत. एसएचजींना द्यावयाची कर्जे, बँकांनी, दुर्लभ घटकांना द्यावयाच्या कर्जांमध्ये समाविष्ट करावीत.

**६) बचत खाते उघडणे :** पंजीकृत असलेले किंवा नसलेले व त्याच्या सभासदांमध्ये बचतीची सवय लावणारे एसएचजी, बँकांमध्ये बचत खाते उघडण्यास पात्र आहेत. अशी बचत खाती उघडण्यापूर्वी त्या एसएचजींनी त्या बँकेकडून कर्जसुविधा घेतल्या असल्याच पाहिजे असे नाही. कारण सर्व पदाधिका-यांच्या केवायसीची पडताळणीच त्यासाठी पुरेशी आहे. ह्याशिवाय येथे स्पष्ट करण्यात येते की, बचत खाते उघडताना केवायसीची पडताळणी आधीच केली गेली असल्याने आणि त्या खात्यातील व्यवहार सुरुच असल्याने आणि ते खाते क्रेडिट जोडणीसाठी वापरले जात असल्याने, एसएचजींच्या कर्ज जोडणीसाठी, सभासदांची किंवा पदाधिका-यांची केवायसी पडताळणी करणे आवश्यक नाही.

**७) एसएचजींना कर्ज हा योजना प्रक्रियेचा एक भाग :** एसएचजींना कर्ज देणे हे त्या बँकेच्या शाखाची कर्ज योजना, ब्लॉक कर्ज योजना, जिल्हा स्तरीय कर्ज योजना व राज्य स्तरीय कर्ज योजना ह्यामध्ये प्रत्येक बँकेने समाविष्ट करावे. एसएचजी-बँक जोडणीसाठी कोणतेही उद्दिष्ट ठरविण्यात आले नसले तरी अशी योजना तयार करतेवेळी ह्या क्षेत्राला जास्तीत जास्त प्राधान्य दिले जावे. बँकेच्या कॉर्पोरेट कर्ज योजनेचा तो महत्वाचा घटक समजला जावा.

**८) मार्जिन व सिक्युरिटीबाबतचे मापदंड :** नाबार्डच्या कार्यकारी मार्गदर्शक तत्वांनुसार, बँकांद्वारे एसएचजींना बचतीसंबंधीची कर्जे (बचत - कर्ज प्रमाण १:१ ते १:४ पर्यंत) मंजुर केली जाऊ शकतात. तथापि परिपक्व एसएचजींच्या बाबतीत, बँकेला तसे वाटल्यास बचतीच्या चौपटीपेक्षाहि अधिक रकमेची कर्जे दिली जाऊ शकतात. अनुभवामधून दिसून आले की, एसएचजींकडून वसूली करण्यामध्ये त्या गटामधील गतिमानता व ओळखीच्या लोकांचा दबाव ह्यांचा खूप उपयोग झाला. मार्जिन व प्रतिभूतीबाबत बँकांना, ह्या चाचणी प्रकल्पाखाली देण्यात आलेली लवचिकता मात्र ह्या चाचणी पलिकडेही ह्या कार्यक्रमाखाली लागु होत राहील.

**९) ठेवावयाची कागदपत्रे :** एसएचजींना कर्ज प्रवाह सुरक्षितपणे देता यावा ह्यासाठी किमान कार्यरीती व कागदपत्रे असणारी साधी सरळ पध्दत असणे अत्यावश्यक आहे. कर्ज देण्याचा प्रकार व कर्जदाराचा कर्जा विचारात घेऊन, बँकांनी, कार्यरीतींमधील अडचणी काढून टाकून, शाखा निबंधकांना पुरेसे अधिकार देऊन कर्ज मंजुरी व वाटप करण्यासाठी तातडीने व्यवस्था कराव्यात. कर्जाच्या अर्जाच्या फॉर्म कार्यरीती व कागदपत्र इत्यादि साधे-सरळ ठेवावेत. त्यामुळे विनाविलंब व कटकटमुक्त कर्ज देता येईल.

**१०) एसएचजींमधील कसुरी करणारांबाबत :** एखाद्या एसएचजीकडून कसुरी झाली नसल्यास, त्या एसएचजीचे सभासद आणि/किंवा त्यांच्या कुटुंबातील काही सभासदांकडून कसुरी होणे, वित्तसहाय्य करणाऱ्या बँकेद्वारा त्या एसएचजीला वित्तसहाय्य आड येऊ नये. तथापि बँकेने दिलेले कर्ज, त्या एसएचजीकडून कसुरी करणाऱ्या सभासदाला अर्थसहाय्य करण्यासाठी वापरले जाऊ नये.

**११) क्षमता-निर्माण व प्रशिक्षण :** ह्या जोडणी - कार्यक्रमातील एक महत्वाची पायरी म्हणजे बँकेच्या क्षेत्र-स्तरावरील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि वरिष्ठ व नियंत्रक अधिका-यांना जाणीव करुन देणे, बँकेचे अधिकारी/कर्मचारी ह्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचा व महत्तेचा, क्षेत्रीय नियंत्रक पातळीवर विचार करता, बँकेने, एसएचजी जोडणी प्रकल्प अंतर्गत करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत आणि क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी लघुमुदतीचे कार्यक्रम ठेवावेत. तसेच मध्य स्तरामधील नियंत्रक अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी जाणीव संवर्धक कार्यक्रम आयोजित करावेत.

**१२) एसएचजींना दिलेल्या कर्जांवरील देखरेख व पुनरावलोकन :** एसएचजींच्या क्षमतेसंबंधाने, बँकांना निरनिराळ्या स्तरांवरील प्रगतीवर नियमितपणे बारीक देखरेख ठेवणे आवश्यक आहे. असंघटित क्षेत्राला कर्जपुरवठा करण्यासाठी एसएचजी बँक जोडणी कार्यक्रम सातत्याने पुढे जात रहावा ह्यासाठी, बँकांना जानेवारी २००४ मध्ये सांगण्यात आले होते की, त्यांच्या एसएलबीसी व डीसीसी सभांमध्ये एसएसजी बँक जोडणी कार्यक्रम त्यांनी अशा सभांच्या कार्यक्रम पत्रिकेवर चर्चेसाठी नियमितपणे ठेवत जावा. त्याचा आढावा सर्वोच्च कॉर्पोरेट स्तरावर दर तीन महिन्यांनी नियमितपणे घेतला जावा. ह्याशिवाय ह्या कार्यक्रमाच्या प्रगतीचे नियमित कालाने पुनरावलोकन केले जावे. ह्याबाबतचा प्रगती-अहवाल नाबार्ड मुंबई येथे (मायक्रो क्रेडिट इन्नोव्हेशन्स विभाग) दर सहा महिन्यांनी, ३० सप्टेंबर व ३१ मार्च रोजी असल्यानुसार तसेच संबंधित सहा माही संपल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावा.

**१३) एसएचजी जोडणीला प्रोत्साहन :** स्वयं सेवा गटांना (एसएचजी) अर्थ सहाय्य करण्याबाबत बँकांनी त्यांच्या शाखांसाठी सुयोग्य प्रलोभने ठेवावीत. तसेच कार्यकारी अत्यंत साध्य-सरळ करुन स्थानिक परिस्थितीला योग्य अशी संपूर्ण लवचिकताही ठेवली जावी. एसएचजीचे अतर्गत गट-चालन त्यांच्यावरच सोपवावे व त्यात विनियमने किंवा विशिष्ट रचना ठेवण्याचा आग्रह धरु नये. एसएचजींना अर्थसहाय्य करण्याचा दृष्टिकोन विना-अडचणीचा असावा आणि त्यात थोडा खर्चही अपेक्षित आहे.

**१४) व्याजदर :** बँकांनी स्वयंसेवा गटांना/लाभार्थी सभासदांना दिलेल्या कर्जांचे व्याजदर बँकांवरच सोपविण्यात आले आहेत.

**१५) संपूर्ण वित्तीय समावेश व एसएचजींची कर्ज आवश्यकता :** २००८-०९ सालासाठी असलेल्या अर्थमंत्र्यांनी केलेल्या केंद्रीय अंदाजपत्रकाच्या घोषणेच्या परिच्छेद ९३ मध्ये दिल्यानुसार, एसएचजी- सभासदांच्या संपूर्ण कर्ज गरजा पूर्ण करण्यास बँकांना सांगण्यात आले होते : *"संपूर्ण वित्तीय समावेश आत्मसात करण्यासाठी बँकांना प्रोत्साहन दिले जाईल. काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी ह्याबाबत घालून दिलेल्या उदाहरणाचे अनुसरण करण्याची विनंती, सरकार सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांना करीत आहे. आणि (अ) उत्पन्न निर्माण कार्यकृती (ब) गृह, शिक्षण, लग्न इत्यादि सामाजिक गरजा व (क) कर्जांची अदलाबदल ह्याबाबतच्या एसएचजींच्या सर्व कर्ज गरजा पूर्ण केल्या जाव्यात."*

**-------***------**

**परिशिष्ट**

**महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी**

| अनु क्र | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | आरपीसीडी.क्र.प्लॅन.बीसी.१३/पीएल-०९.२२/९१/९२ | जुलै २४,१९९१ | ग्रामीण भागातील गरीबांना बँकिंग पर्यंत पोहोचाविण्यात सुधारणा - मध्यस्थ एजन्सींची भूमिका - स्वयंसेवा गट |
| २. | आरपीसीडी.क्र.पीएल.बीसी.१२०/०४.०९.२२/९५-९६ | एप्रिल २,१९९६ | स्वयंसेवा गटांची बँकांशी जोडणी - एनजीओ व एसएसजींवरील कार्यकारी गट - पाठपुरावा |
| ३. | डीबीओडी.डीआयआर.बीसी.११/१३.०१.०८/९८ | फेब्रुवारी १०,१९९८ | स्वयंसेवा गटांच्या (एसएचजी) नावे बचतखाती उघडणे |
| ४. | आरपीसीडी.पीआय.बीसी/१२/०४.०९.२२/९८-९९ | जुलै २४,१९९८ | स्वयंसेवा गटांची बँकांशी जोडणी |
| ५. | आरपीसीए.क्र.प्लॅन.बीसी.९४/०४.०९.०१/९८-९९ | एप्रिल २४,१९९९ | मायक्रो कर्ज संस्थांना कर्जे - व्याजाचे दर |
| ६. | आरपीसीडी.पीएल.बीसी.२८/०४.०९.२२/९९-२००० | सप्टेंबर ३०,१९९९ | मायक्रो कर्ज संस्था/स्वयंसेवा गट ह्यांच्यामार्फत कर्ज देणे. |
| ७. | आरपीसीडी.क्र.पीएल.बीसी.६२/०४.०९.०१/९९-२००० | फेब्रुवारी १८,२००० | मायक्रो कर्ज |
| ८. | आरपीसीडी.क्र.प्लॅन.बीसी.४२/०४.०९.२२/ २००३-०४ | नोव्हेंबर ०३,२००३ | मायक्रो वित्तसहाय्य |
| ९. | आरपीसीडी.क्र.प्लॅन.बीसी.६१/०४.०९.२२/२००३-०४ | जानेवारी ०९,२००४ | असंघटित क्षेत्राला कर्ज देणे |
| १०. | आरबीआय/३८५/२००४-०५, आरपीसीडी.क्र.प्लॅन.बीसी.८४/०४.०९.२२/२००४-०५ | मार्च ०३,२००५ | मायक्रो क्रेडिटखाली प्रगती अहवाल सादर करणे |
| ११. | आरबीआय /२००६-०७/४४१ आरपीसीडी.सीओ.एमएफएफआय.बीसी.क्र.१०३/१२.०१.०१/२००६-०७ | जुन २०,२००७ | मायक्रो वित्तसहाय्य प्रगती अहवाल सादर करणे |
| १२. | आरपीसीडी.एमएफएफआय.बीसी.क्र.५६/१२.०१.००१/२००७-०८ | एप्रिल १५,२००८ | संपूर्ण वित्तीय समावेश आणि एसएचजींची कर्ज - गरज |
| १३. | डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र.८७/१४.०१.००१/२०१२-१३ - | मार्च २८, २०१३ | तुमचा ग्राहक जाणाचे मापदंड/अँटी मनी लॉडरिंग मानके/वित्तीय दहशतवादाचा सामना/प्रिव्हेंशन ऑफ अँटी मनी लॉडरिंग अधिनियम, २००२ खाली बँकांची दायित्वे - स्वयं सहाय्य गटांसाठीच्या मापदंडांचे सुलभीकरण. |